IMPACT FACTOR 8.137 (SJIF)

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal
www.ycjournal.net

INDEX COPERNICUS INTERNATIONAL
ISSN 2277-8071

Indexed in the ICI Journals Master List

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071
DOI PREFIX 10.22183

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal*

One Day National Level Conference On

## ASPECTS OF HUMAN DEVELOPMENT: MULTIDIMENSIONAL PERSPECTIVES

**On Tuesday, 3rd February, 2026**

Organized by

**SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGNE ARTS COLLEGE,**
**Khamgaon, Dist. Buldhana**

*In Collaboration with*

**LATE CHHAGANLAL MULJIBHAI KADHI ARTS COLLEGE,**
**Achalpur Camp, Dist. Amravati**

*Associated with*

**SMT. KAVERIDEVI KEDARMAL AGRAWAL ARTS & COMMERCE COLLEGE,**
**Malkapur, Dist-Buldhana**

**SPECIAL ISSUE**

Volume XIV, Issue IV (A)
Published on 3rd February, 2026
www.ycjournal.net

ICI WORLD of JOURNALS

Impact Factor 8.137

IMPACT FACTOR 8.137 (SJIF)

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal
www.ycjournal.net

INDEX COPERNICUS
ICV 2024 77.35
ISSN 2277-8071

One Day

# National level Inter-Disciplinary Conference

on

# Aspects of Human Development: Multidimensional Perspectives

**Tuesday, 3rd February 2026**

Jointly organized by

*Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon*
*Late Chhaganlal Muljibhai Kadhi Arts College, Achalpur Camp*
*Smt. Kaveridevi Kedarmal Agrawal Arts and Commerce College, Malkapur*

## SCHEDULE

| | |
|---|---|
| ***Session 1*** ***Inaugural Function*** | |
| **10.30am** | **Chairperson:** Hon'ble Dr. Sadgun Deshmukh, Secretary, Sahakar Maharshi Late Bhaskararo Shingne Shikshan & Arogya Prasarak Mandal, Khamgaon<br>**Inaugurator:** Hon'ble Dr. Milind Barhate<br>Vice-Chancellor, Sant Gadge Baba Amravati University, Amravati<br>**Keynote Speaker:** Prof. Dr. J. R. Sonwane<br>Dean, Maharaja Krishnakumarsinhji Bhavnagar University, Bhavnagar (Gujarat)<br>**Chief Guests:**<br>• Hon'ble Shripad K. Tare, Secretary, Dadasaheb Tare Shikshan Sanstha, Achalpur Camp<br>• Hon'ble. Ashok Agrawal, Secretary, Malkapur Shikshan Samiti, Malkapur<br>• Prof. Dr. Ashwin Nisarta, Department of P. G. and P. G. Diploma Programme, Children's University, Gandhinagar (Gujarat) |
| ***Session 2*** ***Contribution of Literature and Social Sciences in Human Development*** | |
| **12:30pm** | **Chairperson:** Dr. Dhananjay Talwankar, Principal, G. S. College, Khamgaon<br>**Speakers:**<br>• Dr. Ravindra Mundare, Senate Member, S. G. B. A. University, Amravati<br>• Dr. Surajprasad Shukla, Janta Kala, Vanijya Mahavidyalay, Malkapur |
| ***Lunch*** **(01:30pm)** | |
| ***Session 3*** ***Commerce, Environment & Sustainable Development*** | |
| **02:00pm** | **Chairperson:** Dr. Rameshwar E. Khadsan, Principal, S. D. M. Burungale Science & Arts College, Shegaon<br>**Speakers:**<br>• Prof. Dr. Devendra Vyas, G. S. College, Khamgaon<br>• Dr. Jayant Wadatkar, President, Maharashtra Pakshimitra Sanghatana |
| ***Session 4*** ***Research Paper Presentation*** | |
| **04:00pm** | **Chairperson:** Dr. Gajanan Sharma, Principal, Matoshri Sayarbai C. Chopda B.Ed. College, Khamgaon |
| ***Valedictory Session*** | |
| **04:30pm** | **Chairperson:** Dr. Kashinath Barhate, Principal, LCM Kadhi Mahavidyalay, Achalpur Camp<br>**Chief Guests:**<br>Dr. Shaktisingh Rajput, Principal, Smt. Kaveridevi Kedarmal Agrawal Arts and Commerce College, Malkapur<br>Dr. Sanjay Patil, Principal, Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon<br>Dr. Namdeo Dhale, Chairman, BOS(History), Amravati<br>Dr. Nilesh Tare, Chairperson, BOS (English) SGB Amravati University, Amravati |

| | | | |
|---|---|---|---|
| 24. | [illegible] योगदान | शिवाजी राजू शिंदे | 128 |
| 25. | सेवेत असलेल्या व सेवेत नसलेल्या मातांच्या रोजगार स्थितीचा किशोरवयीन मुलांच्या सहकार्य, नेतृत्वगुण व शिस्तीवर होणारा प्रभाव | अर्चना विठ्ठलसिंग राजपूत<br>प्रा.डॉ.मेघा देशपांडे | 133 |
| 26. | कोव्हिड-19 महामारीचा मानवी विकासावर परिणाम:मलकापूर शहरातील खाजगी दवाखान्यातील महिला कर्मचाऱ्यांच्या अनुभवांचे बहुआयामी अध्ययन | कु. अनिता विजय निकाडे<br>प्रा. डॉ. अंजली चंद्रकांत पांडे | 139 |
| 27. | विभक्त कुटुंब पद्धतीत आधुनिकतेचा स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक व मानसिक विकासावर होणारा प्रभाव : मलकापूर शहराचा अभ्यास | कु. प्रिती गोविंदसिंह ठाकूर<br>प्रा. डॉ. अंजली चंद्रकांत पांडे | 143 |
| 28. | निवडक कथाकारांच्या कथेतील मानवतावाद | डॉ. दिवाकर विश्राम सदांशिव | 147 |
| 29. | आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी आणि मानवी विकास | कातकडे रामदास पंढरीनाथ | 153 |
| 30. | लोकसाहित्य व लोकसंस्कृतीतील मानवी मूल्ये | प्रा.प्रणाली गणेशराव धुळे | 158 |
| 31. | 'इ.स.२००० नंतरच्या निवडक कृषीप्रधान ग्रामीण कादंबरीतील कृषी प्रश्नांचे चित्रण' | प्रा.विक्रम उ.मोरे<br>प्रोफेसर.डॉ. शिवाजी नागरे | 163 |
| 32. | मानवी विकासात विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका | प्रा. डॉ.जयश्री पद्मराव देशमुख | 168 |
| 33. | मानव विकास मे जीवन कौशल | प्रा. सुषमा सु. जाजू | 171 |
| 34. | मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी भाषेचे योगदान | चव्हाण मनोज उकंडराव | 176 |
| 35. | संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानातील मानवतावाद | प्रा. पुरुषोत्तम शिवचरण निर्मळ | 180 |
| 36. | साहित्यातील मानवी मूल्ये व मानवतातवाद | डॉ. प्रमोद भीमराव गारोडे<br>अजय त्र्यंबकराव शहाकार | 185 |
| 37. | लोकसाहित्यातून अविष्कृत होणाऱ्या लोकसंस्कृतीचे स्वरूप | प्रा. डॉ. नरेंद्र ज. पाखरे | 190 |
| 38. | भारतातील धार्मिक  सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींचे विविध पैलू | कु.सरिता शरद बढे | 195 |
| 39. | सद्‌गुरु वामनराव पै यांच्या साहित्याचे मानवी विकासासाठी योगदान | प्रा.अनिता अरविंद सातव | 201 |
| 40. | 'लक्ष्मणरेषा' या आत्मचरित्रातील मानवी मूल्ये | पांडुरंग रेवन्नाथ पवार<br>प्रा. डॉ. नानासाहेव झगडे | 203 |
| 41. | मानवी विकासात भारतीय संविधानाचे महत्त्व : सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्टिकोनातून एक चिकित्सक अभ्यास | प्रा. गोपालकृष्ण श्रीराम राखोंडे | 208 |
| 42. | माननीय नामदार आकाश फुंडकरयांचे विधानसभेतील व मतदार संघातील कामकाजः एक विश्लेषणात्मक अभ्यास (विशेष संदर्भ वर्ष - 2019 - 2024) | डॉ. अंकुश शरद बिजाका<br>डॉ सागर एस. झंवर | 212 |
| 43. | कुत्रिम बुद्धिमत्ता व शेती | प्रा. डॉ. रवींद्र दामोदरराव इचे | 219 |
| 44. | स्वातंत्र्यवीर सावरकरांचे सामाजिक कार्य आणि मानवतावादी दृष्टिकोन | गंधार विश्राम कुलकर्णी | 223 |

# आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी आणि मानवी विकास

**कातकडे रामदास पंढरीनाथ**
मराठी विभाग
प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आर्ट्स, कॉमर्स & सायन्स कॉलेज, शेवगाव.
मो.नं.-९०२१५६५३७७
ई मेल- ramdaskatkade77@gmail.com

**प्रस्तावना**

साहित्य ही व्यापक संकल्पना आहे.साहित्य व जीवनाचे अतूट नाते आहे.अनुभव, वेदना, संवेदनशीलता असे अनेक धागे एकमेकांमध्ये गुंफून साहित्य निर्माण होत असतं. एखाद्या अनुभवाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा दृष्टीकोन वेग-वेगळा असतो, त्यामुळे त्याचे विविध हुंकार मनात उमटतात आणि मग हे साहित्य लेखणीतून उतरत जाते. साहित्य निर्माण करणारे व्यक्ती ही सर्व सामान्यापैकीच एक असते. मात्र जीवनातील अनुभव घेण्याची तिची दृष्टी आणि आपली दृष्टी यांमध्ये फरक असतो म्हणूनच ती व्यक्ती लेखक व कवी बनते. सर्व सामान्य माणूस अत्यंत व्यावहारिक दृष्टीकोनातून भोवतालचे जग पाहत असतो. त्यातुनच त्याला आवडलेले, त्याने अनुभवलेले त्याच्या भावनांना कितपत व्यक्त करायचे याच्या मर्यादा आखून तो स्वतःचे लेखन करीत असतो. तसेच सत्य सृष्टीतून तो कल्पनाविश्व उभे करीत असतो.

साहित्य म्हणजे मानवी भावना, विचार, अनुभव आणि कल्पनांना भाषेच्या माध्यमातून कलात्मक पद्धतीने व्यक्त करणे, जे वाचकाला आनंद देते आणि जीवनाबद्दल सखोल आकलन करण्यास मदत करते; यात कथा, कविता, नाटक, निबंध, चरित्र, कादंबरी अशा अनेक प्रकारांचा समावेश होतो आणि ते संस्कृती व समाजाचे प्रतिबिंब असते. साहित्य म्हणजे शब्द आणि अर्थाचा मेळ होय. तो रसात्मक वाक्यातुन घेतला गेल्याने साहित्य ललित बनते. साहित्यामध्ये ललित आणि ललीतेत्तर साहित्य असे दोन भाग पडतात. ललित साहित्यात कल्पना, भावना लेखकाची अभिव्यक्ती व अनुभव व्यक्त होत असतात तर ललीतेत्तर साहित्यात वैचारिकतेला प्राधान्य दिले जाते. मराठी साहित्यातील विविध वाङःमय प्रवाहांचा अभ्यास करत असताना प्राचीन प्राचीन साहित्य, अर्वाचिन साहित्य किंवा आधुनिक साहित्य आणि समकालीन साहित्य या तीन प्रकारांचा समावेश होताना दिसतो.साहित्यामधे कल्पनाशक्तीचा वापर करून वाचकाला एका वेगळ्या जगात घेऊन जाणे सोपे होते. साहित्यामध्ये सास्कृतिक प्रतिबिंबाची झालर टाकून एखाद्या समाजाची संस्कृती, त्या समाजाची मूल्ये आणि त्या समाजाच्या समस्या दर्शवणे अधिक सोपे होते. साधारणपणे ११ व्या शतकापासून तर १८ व्या शतकापर्यंत प्राचीन मराठी साहित्याचा विचार होतो. या कालखंडात महानुभाव संप्रदायाच्या साहित्याने सुरुवात होऊन वारकरी संप्रदायाच्या संत ज्ञानेश्वरांपासून तर संत रामदास यांच्या पर्यंत तसेच पंडिती साहित्यातील राम जोशी, प्रभाकर, होनाजी बाळा यांच्या साहित्य रचनेचा विचार होतो.

**आधुनिक मराठी साहित्यातील मानवी विकास आणि आधुनिक तंत्रज्ञान -**

मराठी साहित्य हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि राजकीय जीवनाचे प्रतिबिंब आहे .मध्यकाळापासून )संत पंत तंत (ते आधुनिक काळापर्यंत कथा, कादंबरी, काव्य, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, प्रवासवर्णन या ललित लेखनाचा समावेश होतो .यात पुन्हा मराठी वाङ्मयातील वेगवेगळे प्रवाह येतात .त्यात दलित, ग्रामीण,आदिवासी, स्त्रीवादी, ख्रिस्ती, मुस्लिम, भटक्या विमुक्तांचे साहित्य, जनसाहित्य, बालसाहित्य, विज्ञान, अनुवादित साहित्य, कामगार साहित्य

आदींचा समावेश होतो. २१ व्या शतकात तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे साहित्यनिर्मिती, वाचन, प्रसार आणि अभिव्यक्तीच्या पद्धतीमधे आमूलाग्र बदल झाला .मराठी साहित्याचा इतिहास समृद्ध असून त्यात सामाजिक, सांस्कृतिक आणि भावनिकतेचे सुंदर चित्रण येते.तंत्रज्ञानाचा वेगाने झालेला विकास साहित्यविश्वालाही मोठ्या प्रमाणात प्रभावित करतो आहे .इंटरनेट, सोशल मीडिया, ई-पुस्तके, पॉडकास्ट्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता)AI) यांसारख्या साधनांमुळे साहित्याचा प्रसार आणि निर्मिती या दोन्ही पातळ्यांवर क्रांती घडलेली आपण पाहत आहोतच .लेखक आता ब्लॉग, यूट्यूब चॅनेल्स व ऑडिओ बुक्सद्वारे वाचकांशी थेट संवाद साधत आहेत .पारंपरिक छापील पुस्तकांसोबतच डिजिटल स्वरूपातील साहित्य अधिक सहज उपलब्ध होत आहे .तसेच, नवोदित लेखकांसाठीही लेखन व प्रसिद्धीचे दरवाजे खुले झाले आहेत . मराठी भाषा आणि साहित्याचे डिजिटायझेशन सुरू असून, कृत्रिम बुद्धिमत्ता)AI) आणि अनुवाद साधनांनी जागतिक पातळीवर पोहोचण्याची क्षमता वाढली आहे .तथापि, या तंत्रज्ञानाच्या वापरात साहित्यिक गुणवत्ता आणि मौलिकतेचे जतन काळाची गरज आहे .त्यामुळे मराठी साहित्य आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधताना संतुलन राखणे आवश्यक आहे .या बदलांचा योग्य वापर केल्यास मराठी साहित्याला एक नवीन आयाम मिळू शकतो .

खऱ्या अर्थाने कादंबरी आणि मानवी विकास यांचा जवळचा संबंध आहे; कादंबरी मानवी जीवनातील गुंतागुंतीच्या भावना, सामाजिक समस्या आणि विविध अनुभवांचे चित्रण करून वाचकांना अंतर्दृष्टी देते, ज्यामुळे सहानुभूती वाढते आणि व्यक्तीच्या भावनिक व बौद्धिक विकासाला चालना मिळते, तसेच ती सामाजिक बदलांचे प्रतिबिंब दाखवते आणि व्यक्तीला आत्मपरीक्षणास प्रवृत्त करते, ज्यामुळे व्यक्तिमत्त्व आणि समाजाच्या विकासाला हातभार लागतो. आज भारतीय साहित्य अनेक भाषांमधून लिहिले जात असले तरी तिचे स्वरूप मात्र एकात्म आहे, कारण त्या साहित्याचा पाया हा भारतीय संस्कृती आहे. भारताच्या संदर्भात रवींद्रनाथ टागोर यांनी 'विश्वभारती' तर महाराष्ट्रात साने गुरुजींनी 'आंतरभारती' संकल्पना साधना साप्ताहिकातून स्पष्ट केली होती. भारतीय साहित्यात प्राचीन काळापासून मिथक, चिंतन, मूल्य अशा त्रिविध अंगांनी समान परंतु समांतर अभिव्यक्ती होत आली आहे. त्यातुनच राष्ट्रीयतेचा विचार पुढे आला आहे.

आधुनिक मराठी साहित्याचा समकालीन, सामाजिक, स्थितीगतीशी अंतस्थ आणि खोलवरचा संबंध आहे. त्यामुळेच आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता यांचे आंतरसंबंध व आंतरक्रिया सुविहितपणे निरखून तपासूनच या साहित्याचे आस्वादन व मुल्यांकन होऊ शकते.साहित्याचा सामाजिक अनुबंध लक्षात घेतल्याने ज्या मराठी समाजात अन संस्कृतीत हे साहित्य निर्माण होत आहे आणि त्यांचा साहित्य निर्मितीवर पडलेला प्रभाव यामुळे साहित्याकडे आता केवळ कलात्मक निर्मिती म्हणून न पाहता 'एक सामाजिक सांस्कृतिक घटना' म्हणून पाहणे गरजेचे आहे.

आधुनिकता मराठी साहित्यात १८७५ नंतरच्या पंचवीस-तीस वर्षात नीटपणे प्रस्थापित झाली. आधुनिकतेची अनेक वैशिष्टे आहेत. त्यातील आधुनिकतेचे प्रमुख आशय वैशिष्टे म्हणजे सामाजिक वर्तमान वास्तवाच्या आणि भौतिक जीवनाच्या प्रखर जाणिवेचा वाङ्मयातील अविष्कार होय. या सामाजिक वास्तवाची व्याप्ती किती होती? कोणत्या मराठी समाजाची संवेदना या मराठी साहित्यात प्रतिबिंबित होत होती? असे आणि यांसारखे कितीतरी प्रश्न त्यावेळच्या मराठी साहित्याच्या संदर्भात उपस्थित होतात. त्यांचे थोडक्यात उत्तर असे मिळते की, या काळात आणि पुढे १९२० नंतरही आधुनिक मराठी साहित्य समृद्ध आणि विविधतापूर्ण झाले असले तरी मराठी समाजातील मुठभर उच्चवर्णीयच त्याची निर्मिती करीत होते. साहित्यिक कोणत्याही वर्गाचा, वर्णाचा, जातीचा असला तरी तो प्रतिभावंत असल्यामुळे त्याची वाङ्ममयीन जाणिवही त्यांच्या सर्व समाजाला मानसिकदृष्ट्या व्यापून राहणे आवश्यक असते तरच त्याचे साहित्य त्या समाजाचे प्रतिनिधित्व करू शकते. असे असले तरी मूठभरांच्या संकुचित जाणिवांच्या साहित्याला सर्व आधुनिक मराठी

समाजाच्या साहित्याचे प्रतिनिधित्व दिले जात होते आणि त्या अर्थाने त्याला मराठी साहित्य ही संज्ञा वापरली जात होती.

**आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी-**

मराठी साहित्यातील एक समृद्ध दालन म्हणजे मराठी कादंबरीचे विश्व होय. लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातून विविध विषय हाताळले. तत्कालीन समाज जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न केला. त्याकाळी सामाजिक आणि राष्ट्रीय पातळीवर ज्या लाटा उसळल्या त्या लाटांचे चित्रण केले आहे. त्यातूनच मराठी कादंबरीचे विश्व विस्तारले. महत्वाचे म्हणजे सदाशिव पेठी वातावरणातून कादंबरी बाहेर पडली अन शे-सव्वाशे वर्षात टी खेडेगावातील शेतमजुराच्या गोठ्यापर्यंत पोहचली. कादंबरीचे हे बदलते विश्व खरोखरच मनाला आगदी भुरळ घालणारे ठरले आहे. कादंबरी हा आधुनिक काळात उदयाला आलेला प्रकार मानला जात असला तरी त्याची पाळेमुळे प्राचीन वाड्मयात सापडतात. समाजपरिवर्तन जसजसे होत गेले तसा काळ ही बदलू लागला. त्याचबरोबर माणसांच्या विचारांमध्ये परिवर्तन होत गेले. या साऱ्यांचा परिणाम कादंबरीबरोबरच सर्व साहित्यावर देखील झाला.

कादंबरी सभोवतालच्या जीवनातील घटना-घटकातून आकारास येत असते. कादंबरी जीवनाचा शोध तर घेत असतेच पण त्याचबरोबर आत्म्याचाही शोध घेत असते. कादंबरी ही काही घटना तसेच पात्रांच्या सहाय्याने जीवनाचा व मानवी मनाचा शोध घेत असते. साहित्य विश्वातील प्रधान साहित्य प्रकार म्हणून ओळखला जाणारा 'कादंबरी' हा वाङःमय प्रकार आधुनिक काळात उदयाला आला आहे. मराठी कादंबरीच्या उदयापासून मराठी कादंबरी ही विविध टप्प्यातून आपला प्रवास करीत आली आहे. कादंबरीचा विकास जसजसा होत गेले. या प्रवाहांना बरोबर घेऊनच मराठी कादंबरीचे विश्व चढ-उताराने विस्तारत गेले. मराठी कादंबरी वाड्मयाचा पाया हरीकेशवजी पठारे यांनी 'यांत्रिकीकरण' या भाषांतरीत कादंबरीने रचला. 'बनियनच्या' 'पिलग्रिम्स प्रोग्राम' या ग्रंथाचे मराठीत भाषांतर इ. स. १८४१ मध्ये केले. येथूनच मराठी कादंबरीचा प्रवाह वाहत राहिला आहे.

मराठी कादंबरी हा साहित्यप्रकार प्रारंभापासून अनेक वाटा-वळणे घेत विकसित होत गेला असला तरी प्रत्येक काळाचे सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न मराठी कादंबरीने अगदी प्रभावीपणे मांडलेले आपल्याला दिसून येते.समाज व्यवस्थेची घडी ही कधीच स्थिर आणि एकपदरी नसते. तिच्यात नेहमीच स्थित्यंतरे होत असतात. सामाजिक स्थित्यंतराबरोबरच कादंबरीचे आशयविश्व काळानुरूप बदलत असते. १९६० नंतर मात्र समाज जीवनामध्ये विविधांगी सर्व पातळ्यांवर स्थित्यंतरे जाणवू लागली होती. या स्थित्यंतरांचे प्रतिबिंब या काळातील कादंबरीत प्रतिबिंबित झालेले दिसते. मात्र २००० नंतरच्या काळाचा विचार करता १९६० ते २००० पर्यंतचा काळ हा काहीसा स्थिर आणि फारसा भयावह नव्हता असे म्हणता येईल. म्हणजे २००० पूर्वीच्या काळात समाज जीवनात कोणते बदल, ताण-तणाव, संघर्ष जाणवत नव्हते असे म्हणता येणार नाही . फक्त या काळातील सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराची गती मात्र अतितीव्र नव्हती एव्हढेच !

१९७५च्या सुमारास ग्रामीण साहित्य चळवळ सुरु झाली. दलित साहित्यापाठोपाठ झालेला हा आणखी एक सांस्कृतिक उद्रेक होता. ज्या सामाजिक अपरिहार्यतेतून दलित साहित्य चळवळीचा उदय झाला तीच सामाजिक परिस्थिती ग्रामीण साहित्य , जनवादी साहित्य, आदिवासी साहित्य या चळवळीना कारणीभूत ठरली. स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वत्रिक शिक्षणामुळे ग्रामीण बहुजन समाजात सांस्कृतिक चलनवलनास प्रारंभ झालेला होता. परिवर्तनवादी चळवळी गतिमान झालेल्या या काळात ग्रामीण साहित्याने ही आपली भूमिका स्पष्ट केली. आणि येथेच ग्रामीण साहित्य चळवळ सुरु

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal
www.ycjournal.net
IMPACT FACTOR 8.137 (SJIF)
ICV 2024 77.35
ISSN 2277-8071

झाली. ग्रामीण कादंबरीचा हा प्रवाह पुढे वाहता ठेवण्यासाठी महत्वाचे कार्य अनेक कादंबरीकारानी केले आहे.[४] त्यामध्ये आनंद यादव 'कागुद' आणि 'सावली' (१९८६) , पुरुषोत्तम बोरकर 'मेन इन इंडिया' (१९८७), बाबाराव मुसळे 'हाल्या हाल्या दुधू दे'(१९८५), नागनाथ कोतापल्ले 'उलट चालीला प्रवाहो,(१९८५), राजन गवस 'चौडक'(१९८५), विश्वास पाटील 'झाडाझडती' इत्यादी कादंबऱ्यातुन ग्रामीण जीवनातील ताण-तणाव स्थित्यंतरे प्रकट केली आहेत.त्याचबरोबर बाबा भांड 'जरंगा'(१९७८), काजोळ (१९८४), नामदेव ढसाळ 'हाडकी हाडवळ' , विजय सिरसाठ 'काळगर्भ' , रंगनाथ पठारे 'ताम्रपट' , रंगराव पाटील 'दंश' (१९८७) इत्यादी कादंबऱ्यातुन ग्रामीण जीवनातील वास्तवाचे यथार्थपणे दर्शन घडविले आहे. आजच्या ग्रामीण साहित्य अभ्यासकांनी ग्रामीण कादंबरीचा सखोल अभ्यास करून तिचे वेगळेपण दाखविले आहे आणि एक नवे परिमाण प्राप्त करून दिले आहे. या संदर्भात रविंद्र ठाकूर लिहितात-" मराठी ग्रामीण कादंबरीने 'कादंबरी' या साहित्य प्रकारच्या प्रकृतीचे भान अगदी सुरुवातीपासून बाळगण्याचा प्रयत्न केले आहे.

सन २००० नंतरचे पहिले आणि दुसरे दशक मात्र अनेक सामाजिक प्रश्न घेऊन आलेले दिसते. समाजजीवनात प्रचंड उलथा-पालथ घडविणारे ठरले आहे. अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न या काळात धारदार आणि टोकाचे बनलेले दिसतात. भाषेच्या आस्मिततेचा आणि अस्तित्वाचा प्रश्न , धर्म, जात-वर्ग, प्रदेशाचे प्रश्न , वाढती गुन्हेगारी, भोगवादी, चंगळवादीवृत्ती, पर्यावरणाचे प्रश्न , सायबर क्राइम, शेतकऱ्याच्या वाढत्या आत्महत्या , नपुंसक शिक्षण व्यवस्थेचा दिखाऊपणा, राजकारण्याची स्वार्थी व भ्रष्टाचारी प्रवृत्ती, आरक्षणाच्या मागणीसाठी निघालेले विविध मोर्चे, धर्मा-धर्मात वाढणारी तेढ, असहिष्णुतेचा प्रश्न, कोपर्डी निर्भयासारखी दुर्दैवी घटना त्यातून पुढे आलेला स्रियांवरील आत्याचाराचा व सुरक्षिततेचा प्रश्न , विस्थापित बधावांचा वाढता आक्रोश, दहशतवाद, नक्षलवाद, वाढती भांडवलशाही वृत्ती 'सेझ' सारख्या परदेशी कंपन्यांनी निर्माण केलेली शोषण परंपरा समाज जीवनात प्रचंड ढवळा-ढवळ करून गेली. या ढवळा-ढवळीचे पडसाद २००० नंतरच्या कादंबरीत पडलेले दिसतात.

सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास'(२००२) या कादंबरीतुन अस्मानी-सुलतानी संकट परंपरांच्या तावडीत सापडून ऱ्हासपर्वाकडे वाटचाल करणाऱ्या संबंध कृषीव्यवस्थेचा घेतलेला आढावा अस्वस्थ करणारा आहे. हरितक्रांतीचे गोड-आंबट अनुभव चाखलेल्या शेतकऱ्याला जागतिकीकरणामुळे किती मोठ्या शोषणाला व स्थित्यंतराला सामोरे जावे लागले ते तपशिलासह कादंबरीत मांडले आहे. तसेच प्रविण दशरथ बांदेकर यांच्या 'चाळेगत'(२००९) या प्रयोगशील कादंबरीने कोकण प्रदेशातील 'भुईजड' झालेल्या तरुण पिढीची शोकांतिका अनेक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्न करते. 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (२०११) या आनंद बिंगकर याच्या कादंबरीने जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर शोषणव्यवस्थेच्या अग्रस्थानी सापडलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्याच्या जीवनमरणाचा प्रश्न आणि त्यांचे धोक्यात आलेले सामाजिक स्थान या कादंबरीत मांडलेले आहे.

'जोहर'(२००५) या सुशील धसकटे लिखित कादंबरीत अलीकडे प्रसिध्द झालेल्या आणि चर्चेचा विषय ठरलेल्या कादंबरीत शेवटच्या पानापर्यंत शहर आणि ग्रामीण अशी नैसर्गिकपणे हिंदकळत जाते. गावपण, माणूसपण, मुल्ये संपूर्णतः नष्ट होण्याचा संघर्ष त्याचबरोबर नपुंसक शिक्षणव्यवस्था, बदलते ग्रामजीवन, भ्रष्ट प्रसारमाध्यमे ह्या संबंध व्यवस्थेचा कॅनव्हास जोहरमध्ये चितारला आहे. डॉ.जनार्धन वाघमारे यांची 'बखर एका खेड्याची'(२००५) ही कादंबरी एक सर्वसाधारण खेडे हेच ह्या कादंबरीचे नायकत्व स्वीकारते. या कादंबरीत गतकालीन घटनांना केंद्रस्थानी ठेऊन एक स्मरणचिंतन व्यक्त झाले आहे. 'धूळमाती'(२०१४) कृष्णांत खोत यांच्या कादंबरीत गावठामध्ये पन्हाळ्याच्या परिसरात घडणाऱ्या जीवनाचं दर्शन तिथल्या बोलीसह साक्षात उभं राहतं. 'कोलाज संभ्रमाचे वर्तमान' (२०२३) या अशोक लिंबेकर लिखित आजच्या

IMPACT FACTOR 8.137 (SJIF)

**RESEARCH NEBULA**

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal*

www.ycjournal.net

INDEX COPERNICUS ICV 2024 77.35

ISSN 2277-8071

कादंबरीमध्ये समाजातल्या अनेक छोट्या-मोठ्या व्यवस्था पोखरल्या जात असताना धर्म, जात, पक्ष यांचे झेंडे नाचवत कोलाहाल करणाऱ्या आंधळ्या समूहांचे आवाज टिपेला पोहचलेले असतांना संवेदशील माणसांनी परस्परांना घातलेली हाक या कथानकातून ऐकू येत आहे. ही कादंबरी म्हणजे मुल्याऱ्हासाचं दुखः सोसणाऱ्या माणसांची उमेद टिकवून ठेवण्याची धडपड आहे. आतला दिवा विझू न देण्याचा प्रयत्न आहे.जीवनहितैषी गोष्टींना धरून ठेवण्याचा निकराचा अट्टाहास आहे. समकालीन कादंबरीत स्वतःचं स्वतंत्र स्थान निर्माण करू पाहणारे हे 'संभ्रमाचे वर्तमान' एक संवेदनशील आणि समंजस लेखन आहे.आधुनिक मराठी साहित्यातील कादंबऱ्यांमध्ये **भालचंद्र नेमाडे यांची 'कोसला', वि .स .खांडेकर यांची 'ययाति', शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय',** आणि **रणजित देसाई यांची 'श्रीमान योगी'** यांसारख्या अनेक महत्त्वाच्या कलाकृतींचा समावेश आहे, ज्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि मनोवैज्ञानिक पैलूंना स्पर्श करत वास्तववादी व प्रयोगशील मांडणीतून मराठी कादंबरीला नवी दिशा दिली, ज्यात 'कोसला' ही आधुनिकतेची महत्त्वपूर्ण ओळख ठरली.

**समारोप**

सन २००० नंतरच्या मराठी कादंबरीने समाज, संस्कृती, राजकारण, अर्थ, भाषा, धर्म आणि मूल्य या घटकांच्या अनुषंगाने अनेक प्रश्न मांडलेले दिसतात. २००० नंतरच्या काळात लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. इथे विवेचनासाठी मोजक्याच कादंबऱ्याचा विचार केलेला आहे. या काळात झपाट्याने बदलणारे समाज जीवन आणि सांस्कृतिक स्थित्यंतरामध्ये विविध प्रश्न, ताण-तणाव, संघर्ष, क्रिया-प्रतिक्रिया टिपताना कादंबरीकाराची कसरत लागते.

**संदर्भ-**

१) कादंबरीची रचना: प्रा. श्री.मा. कुलकर्णी, उन्मेष प्रकाशन, नागपूर, पहिली आवृती १९५६.
२) मराठी कादंबरी तंत्र आणि विकास: प्रा.बापट गोडबोले, व्हिनस प्रकाशन पुणे, तिसरी आवृती १९९३.
३) स्वातंत्र्योत्तर वाङ्मयीन प्रवाह: यशवतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक, पुनर्मुद्रण २०२०.
४) जोहर : सुशील धसकटे, अक्षरवाङःमय प्रकाशन पुणे, पहिली आवृती २०१५.
५) धूळमाती: कृष्णात खोत, मौजे प्रकाशन मुंबई, पृ.क्र.७७.
६) बखर एका खेड्याची : जनार्धन वाघमारे, पद्मगंधा प्रकाशन पुणे, पहिली आवृत्ती २००५.
७) साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह: डॉ. शरणकुमार लिंबाळे,

SAHAKAR MAHARSHI LATE BHASKARRAO SHINGNE ARTS COLLEGE
Khamgaon, Dist. Buldhana, Maharashtra
LATE CHHAGANLAL MULJIBHAI KADHI ARTS COLLEGE
Achalpur Camp, Dist. Amravati, Maharashtra
SMT. KAVERIDEVI KEDARMAL AGRAWAL ARTS & COMMERCE COLLEGE
Malkapur, Dist-Buldhana, Maharashtra

# CERTIFICATE

This is to certify that Shri./Smt./Ku./Dr./Prof. कातकडे रामदास पंढरीनाथ

has actively participated in the One-Day National Conference held on 3rd February 2026, organized by Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne Arts College, Khamgaon, Late Chhaganlal Muljibhai Kadhi Arts College, Achalpur Camp, and Smt. Kaveridevi Kedarmal Agrawal Arts and Commerce College, Malkapur, on the theme "Aspects of Human Development: Multidimensional Perspective." He/She has participated, presented, and published a research paper on

आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी आणि मानवी विकास

This paper is published in Research Nebula Volume XIV, Issue IV ( B ) Special Issue, February 2026, ISSN: 2277-8071, I.F: 8.137

| DR. ALKA JADHAO | PROF.DR. NILESH TARE | PROF.DR. HARSHA DHALE | MR.S.R.RAJPUT | DR. KASHINATH BARHATE | DR. SANJAY PATIL |
|---|---|---|---|---|---|
| *Convener* | *Convener* | *Convener* | *Conference Organizer* | *Conference Organizer* | *Conference Organizer* |